विज्ञान साहित्य हा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी साहित्यक्षेत्रात नव्याने उदयाला आलेला आणि हळुहळू प्रभावी ठरलेला महत्त्वाचा साहित्यप्रवाह आहे. जयंत नारळीकरांसारख्या जगप्रसिद्ध संशोधकाने ~~विज्ञान~~ मराठी भाषेत विज्ञान साहित्याची निर्मिती करावी ही गौरवाची गोष्ट आहे. असे असले तरी अद्याप मराठीत विज्ञान साहित्याची चिकित्सक समीक्षा पुरेशा गांभीर्याने होताना दिसत नाही.

ही उणीव जाणवल्यामुळे श्रीमती ना. दा. ठाकरसी (एस. एन. डी. टी.) महिला विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांनी सुरुवातीपासून जागरूकपणे या दिशेने प्रयत्न केले. त्यांनी विद्यापीठाच्या एम. ए. मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात विज्ञान साहित्याचा आवर्जून समावेश केला. तसेच विज्ञान, कला, साहित्य आणि सौंदर्य या सूत्राविषयीची दोन राष्ट्रीय चर्चासत्रेही मराठी विभागातर्फे आयोजित केली.

अशाच प्रयत्नांचा एक भाग म्हणून दि. १४, १५ व १६ नोव्हेंबर २०१४ या तीन दिवशी मराठी विभागाने विज्ञान-कथा-समीक्षा या विषयावर एक कार्यशाळा आयोजित केली होती. विज्ञानकथेची रचना, विज्ञानकथेतील 'विज्ञाना'चे स्वरूप, विज्ञानकथेच्या समीक्षेतील अडचणी अशा विषयांवर व्याख्याने आयोजित करणे, चर्चा घडवून आणणे आणि विज्ञानकथेची उत्तम समीक्षा करण्यासाठी मार्गदर्शन करणे अशी उद्दिष्टे ही कार्यशाळा आयोजित करण्यामागे होती.

या कार्यशाळेमध्ये एम. ए., एम. फिल. आणि पीएच. डी करिता अभ्यास करणाऱ्या तेवीस विद्यार्थिनींनी शिबिरार्थी या नात्याने सहभाग घेतला. मराठी विज्ञान परिषदेने पाठवलेल्या तेवीस कथा या शिबिरार्थींना देऊन विभागप्रमुख डॉ. देशपांडे यांनी त्यांना शिबिर-पूर्व मार्गदर्शन करून त्यांच्याकडून समीक्षा लिहून घेतली. कार्यशाळेत सुरुवातीचे दोन दिवस त्या प्रत्येक समीक्षालेखाचे वाचन करून त्यावर चिकित्सक चर्चा करण्यात आली. दुसऱ्या दिवशीच्या चर्चेनंतर शिबिरार्थींना उपस्थित तज्ज्ञ मार्गदर्शक लेखकांच्या कथा देऊन समीक्षालेखन

एका दिवसात, करण्यास सांगितले गेले. तिसऱ्या दिवशी स्वतः कथालेखकांच्या उपस्थितीत त्या समीक्षालेखांचे वाचन होऊन त्यावर चर्चा केली गेली. या कार्यशाळेतील शिबिरार्थींना अधिक वाचनासाठी विज्ञान साहित्याविषयीचे महत्त्वाचे समीक्षालेख मराठी विभागाने मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिले.

शिबिरार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाळ फोंडके, डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे, श्री. सुबोध जावडेकर, डॉ. यशवंत देशपांडे, प्रा. माधुरी शानभाग यांसारखे नामवंत विज्ञानकथालेखक आणि डॉ. सु. म. तडकोडकर, डॉ. मोना चिमोटे, श्री. दीपक घारे आणि श्री. अ. पां. देशपांडे यांच्यासारखे अभ्यासू समीक्षक या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

या कार्यशाळेमुळे शिबिरार्थींना प्रत्यक्ष समीक्षालेखन करण्याचा अनुभव तर मिळालाच, त्याचबरोबर स्वतः विज्ञानकथाकारांना आणि तज्ज्ञ समीक्षकांना भेटण्याचा त्यांच्याशी चर्चा करण्याचा आनंदही मिळाला. अनेकजणींनी याविषयी समाधान व कृतज्ञताही व्यक्त केली.

या कार्यशाळेमुळे विज्ञानकथासमीक्षेला योग्य दिशा मिळेल असा विश्वास विभागप्रमुख डॉ. ~~देशपा~~ शिरीष गोपाळ देशपांडे यांनी व्यक्त केला. या कार्यशाळेसाठी मराठी विभागाला मराठी विज्ञान परिषदेचे सहकार्य लाभले. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या उपक्रमाला आर्थिक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

(डॉ. अरुणा श्री. दुभाषी)